RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष २, अंक १५६] बुधवार, नोव्हेंबर ३०, २०१६/अग्रहायण ९, शके १९३८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३०३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१,
दिनांक ३० नोव्हेंबर २०१६

**अधिसूचना**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) (सुधारणा) नियम, २००४.**

क्रमांक व्हीपीएम. २०१६/प्र. क्र. १०३/पंरा. ४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (१९५९ चा तीन) याच्या कलम १७६ मधील पोट-कलम (२) चा खंड (सव्वीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने ग्रामपंचायतींकडून कर व फी (शुल्क) आकारणी करण्याकरिता, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे), तयार केला आहे ;

आणि ज्याअर्थी, पंचायत क्षेत्रात येणाऱ्या क्षेत्रांना भेट देणाऱ्या अभ्यागतांवरील प्रतिव्यक्ती कर आकारणी करण्याकरिता, उक्त नियमामध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) (सुधारणा), नियम, २००४ अन्वये भाग वीस समाविष्ट करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी खाली दिलेल्या तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांत प्रवेश करणाऱ्या अभ्यागतांकडून प्रतिव्यक्ती कर घेण्यासाठी उक्त नियमाच्या नियम १४५ चा उप नियम (१) अन्वये शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम (सुधारणा) नियम, २००४ च्या नियम २ व महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम, १९६० च्या नियम १४५ च्या उप नियम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे जेथे भाग वीस (पंचायत क्षेत्रात येणाऱ्या क्षेत्रांना भेट देणाऱ्या अभ्यागतांवरील प्रतिव्यक्ती कर) च्या तरतुदी, ही अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रा-मध्ये** प्रसिद्ध झाल्यापासून सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील खाली दिलेल्या तक्त्यातील स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तालुक्यातील स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रातील स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राकरिता लागू होईल.

**तक्ता**

| अ. क्र. (१) | क्षेत्र (२) | ग्रामपंचायत (३) | तालुका (४) |
|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग किल्ला .. .. | वायरी-भूतनाथ | मालवण |
| २ | देवबाग नदी न समुद्र यांचा संगम (बीच) .. .. | देवबाग | |
| ३ | बेट .. .. | | |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४ | समुद्र किनारा | तारकर्ली-काळेथर | |
| ५ | डॉल्फिन दर्शन | | |
| ६ | सुरु बन | | |
| ७ | समुद्र किनारा | तोंडवळी | |
| ८ | माडबाग | | |
| ९ | सुरू बन | | |
| १० | विजयदुर्ग किल्ला | विजयदुर्ग | देवगड |
| ११ | समुद्र किनारा | | |
| १२ | कुणकेश्वर मंदिर | कुणकेश्वर | |
| १३ | समुद्र किनारा | | |
| १४ | किरणपाणी सूर्यास्त दर्शन | आरोंदा | सावंतवाडी |
| १५ | हिरण्यकेशी | आंबोली | |
| १६ | नांगरतास | | |
| १७ | राघवेश्वर व गणेश मंदिर | | |
| १८ | महादेव गड पॉईंट | | |
| १९ | कावळेसाद पॉईंट | गेळे | |
| २० | पाझर धबधबा | सावडाव | कणकवली |
| २१ | नापणे धबधबा | शेर्पे | |
| २२ | सायबा मंदिर परिसरातील समुद्र किनारा | शिरोडा | वेंगुर्ला |
| २३ | वेळागर समुद्र किनारा | | |
| २४ | आरवली टाक किनारपट्टी | सागरतीर्थ | |
| २५ | सागरतीर्थ किनारपट्टी | | |
| २६ | भोगवे समुद्र किनारा | भोगवे | |
| २७ | किल्ले निवती व समुद्र किनारा | | |
| २८ | समुद्र किनारा | मोचेमाड | |
| २९ | धबधबा | मांगेली | दोडामार्ग |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय बनकर,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort
Mumbai 400 001, dated the 30th November 2016

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS TAXES AND FEES (AMENDMENT) RULES, 2004.

No.VPM.2016/CR-103/PR. 4.—Whereas, the Government of Maharashtra has, in exercise of the powers conferred by clause (*xxvi*) of sub-section (*2*) of section 176 of the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959), made the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960 (hereinafter referred to as "the said Rules"), for the purposes of levy of taxes and fees by the Village Panchayats ;

And whereas, Part XX was inserted in the said Rules by the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees (Amendment) Rules, 2004, with a view to levy capitation tax on visitors visiting places situated within the area of Panchayat ;

And whereas, the Chief Executive Officer of Zilla Parishad, Sindhudurg has forwarded the proposal to the Government for sanction of taking capitation tax, as required under sub-rule (1) of rule 145 of the said Rules, from the visitors enter in the area mentioned in column (2) of the Table given below ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by rule 2 of the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees (Amendment) Rules, 2004 read with sub-rule (1) of rule 145 of the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960, the Government of Maharashtra hereby specifies the area mentioned in column (2), situated within the jurisdiction of the Village Panchayats mentioned in column (3) in the Taluka mentioned in column (4) of the table given below, in the Sindhudurg District, where the provisions of Part XX (capitation tax on visitors visiting places situated within the area of Panchayat) shall be applicable from the date of the publication of this notification in the *Maharashtra Government Gazette* :—

TABLE

| Sr. No. | Area | Village Panchayats | Taluka |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Sindhudurg Fort .. .. | Wairy-Bhutnath | Malvan |
| 2 | Devbagh River and Ocean Confluence .. .. | Devbagh | -do.- |
| 3 | Island .. .. | -do.- | -do.- |
| 4 | Sea Shore/Beach .. .. | Tarkali-Kalethar | -do.- |
| 5 | Dolphin Point .. .. | -do.- | -do.- |
| 6 | Suruban .. .. | -do.- | -do.- |
| 7 | Sea Shore/Beach .. .. | Tondavali | -do.- |
| 8 | Madbag .. .. | -do.- | -do.- |
| 9 | Suruban .. .. | -do.- | -do.- |
| 10 | Vijaydurg Fort .. .. | Vijaydurg | Devgad |
| 11 | Sea Shore/Beach .. .. | -do.- | -do.- |
| 12 | Kunkeshwar Temple .. .. | Kunkeshwar | -do.- |
| 13 | Sea Shore/Beach .. .. | -do.- | -do.- |
| 14 | Kiranpani Sunset Point .. .. | Aronda | Sawantwadi |

TABLE—*Contd.*

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| 15 | Hiranyakeshi .. .. | Amboli | Sawantwadi |
| 16 | Nangartas ... .. | -do.- | -do.- |
| 17 | Raghaweshwar and Ganesh Temple .. .. | -do.- | -do.- |
| 18 | Mahadev gad Point .. .. | -do.- | -do.- |
| 19 | Kawalesad Point .. .. | Gele | -do.- |
| 20 | Pazar Waterfall .. .. | Savdav | Kankawali |
| 21 | Napane Waterfall .. .. | Sherpe | -do.- |
| 22 | Sea Shore/Beach surrounding .. ..<br>Saiba Temple. .. .. | Shiroda<br>-do.- | Vengurla<br>-do.- |
| 23 | Velagar Sea Shore/Beach .. .. | -do.- | -do.- |
| 24 | Aravali Sea Shore/Beach .. .. | Sagartirth | -do.- |
| 25 | Sagartirth Sea Shore/Beach .. .. | -do.- | -do.- |
| 26 | Bhogave Sea Shore/Beach .. .. | Bhogave | -do.- |
| 27 | Nivati Fort and Sea Shore/Beach .. .. | -do.- | -do.- |
| 28 | Sea Shore/Beach .. .. | Mochemad | -do.- |
| 29 | Waterfall .. .. | Mangeli | Dodamarg |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY BANKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.